**रे.दि.मु.नं. ३३/२०२२**
**नि.क्र.७० लगत**

**<u>वादीचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे वकील श्री.आर.के. शिंदे यांचेकडुन शपथेवर सुरु</u> -**

१०. माझी जन्मतारीख दि.०९/०४/१९७७ आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात दावा मिळकती कशा पध्दतीने वडीलोपार्जीत आहेत, त्यांचा मुळ पुरुष कोण होता, त्याबाबतचे फेरफार, वारस नोंदी याबाबत मजकूर नमुद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की दाव्याकामी मी कागदोपत्री पुरावा म्हणून सातबारा उतारे, घर क्र. ६ ब चा असेसमेंटचा उतारा व वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की कागदोपत्री पुराव्यात मी ग्रामपंचायत घर क्र. ६ब या मिळकतीचा मुळ पुरुष, त्याच्या नावाची नोंद असलेला असेसमेंटचा उतारा किंवा इतर पुरावा दाखल केला नाही. सोनवणे गावात माझी आई सन २००४ पासून वास्तव्यास आहे. सन २००४ पासून आम्ही रहात असलेल्या घराची घरपट्टी पाहण्याचा योग मला कधी आला नाही हे म्हणणे खरे आहे. २००६ साली मला या घराची घरपट्टी पाहण्याचा योग आला. मी २००६ साली ज्या मिळकतीवर ते घर उभे आहे त्याचा सातबारा उतारा पाहिला नाही. सन २००६ नंतर २०२१ मध्ये मी मिळकतीचे सातबारे उतारे पाहिले. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही शासकीय मुल्यांकन करणा-या अधिका-यांकडून दावा मिळकत घर क्रमांक ६ब यांचे मुल्य मी तपासले नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईचा विवाह १९५३ साली झाला. हे म्हणणे खरे नाही की सन १९६९ मध्ये माझ्या आईने व तिच्या बहीणीनी त्यांचे हक्क त्याचे भाउ अनंत, वसंत आणि रजनीकांत यांच्या लाभात प्रेमापाटी विनामोबदला तोंडी वर्दी देवून महसुल दप्तरी सोडले होते. फेरफार क्र. १०२४ मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की या फेरफार अन्वये अनंत, वसंत आणि रजनीकांत यांची नावे दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी लागली. हे म्हणणे खरे आहे की हा फेरफार २५ मार्च १९७० रोजी मंजूर झाला. हे म्हणणे खरे आहे की या फेरफारीला मी किंवा माझ्या आईने आजतागायत कधीही महसुल दप्तरी आव्हानीत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की सोनवडे येथे रहायला आल्यानंतर प्रतिवादी क्र. ४ अभिजित खातु माझ्या आईचा सर्व खर्च करीत होते. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत घर क्र. ६ ब महसुल सदरी सध्या शामला व सुहास अनंत खातु यांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी संमत्ती दिल्याने मी त्या घरात राहत होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आणि माझ्या आईचा खाण्यापिण्याचा खर्च प्रतिवादी क्र. २ व ४ करतात. हे म्हणणे खरे नाही की माझा जमिन मिळकतीमध्ये आणि घर मिळकतीमध्ये १/४ हिस्सा असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की वसंत खातु अविवाहीत मयत होते. हे म्हणणे खरे नाही की त्याच्या मृत्यूपूर्वी त्यांनी मृत्यूपत्र करुन अविभाज्य हिस्सा प्रतिवादी क्र. ४ व प्रतिवादी क्र. १ यांना दिला. हे म्हणणे खरे नाही की दाव्यास खोटे कारण नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मला व माझ्या आईला दावा मिळकतीमध्ये १/४ हिस्सा मिळण्यास आम्ही पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादींना दि.२५/१०/२०२१ रोजी पाठविलेल्या नोटीसमधील मजकूर खोटा आहे. हे

म्हणणे खरे नाही की प्रतिवादींना त्रास देण्याकरीता व त्यांच्याकडून पैसे उकळण्याकरीता हा खोटा दावा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**
**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. ०२/०२/२०२४**